# जिल्हा परिषद रत्नागिरी

## शुध्दीपत्रक क्र.२

## सरळसेवा भरती प्रक्रिया २०२३

**जिल्हा परिषद रत्नागिरी अंतर्गत गट-क संवर्गातील रिक्त पदे सरळसेवेने भरण्यासाठी प्रसिध्द करणेत आलेल्या जाहिरातीतील Application Link मधील सुधारणाबाबत शुध्दीपत्रक**

---

| अ.क्र. | संवर्गाचे नाव | सुधारणा |
|---|---|---|
| १ | कनिष्ठ सहाय्यक (लिपिक) | कनिष्ठ सहाय्यक या संवर्गासाठी मराठी टंकलेखन आवश्यक करण्यात आलेले आहे, असे जाहिरातीत नमूद आहे.<br>तथापि, माजी सैनिक, प्रकल्पग्रस्त, भूकंपग्रस्त, स्वातंत्र्य सैनिकांचे नामनिर्देशित पाल्य, सन १९९१ चे जनगणना कर्मचारी, सन १९९४ नंतरचे निवडणूक कर्मचारी, पदवीधर/पदविकाधारक अंशकालीन कर्मचारी व अनाथ मधून अर्ज करणाऱ्या ज्या उमेदवारांकडे मराठी टंकलेखन नाही, असे उमेदवार देखील अर्ज करु शकतील. |
| २ | स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक | स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक या संवर्गाचा ऑनलाईन अर्ज करताना Have you passed recognized equivalent two Years Course in Construction Supervisor ? असा प्रश्न विचारणेत आला होता. परंतु सदरचा कोर्स हा एक वर्षाचा असल्यामुळे त्या पदासाठी उमेदवार अर्ज सादर करु शकत नव्हते.<br>तथापि, त्यामध्ये सुधारणा करणेत आली असून आता Have you passed recognized equivalent Course in Construction Supervisor? असा प्रश्न विचारणेत येत आहे. त्यामुळे सदर पदासाठी इच्छुक उमेदवार आपले अर्ज सादर करु शकतील. |
| ३ | कंत्राटी ग्रामसेवक/ पशुधन पर्यवेक्षक | कंत्राटी ग्रामसेवक/पशुधन पर्यवेक्षक या संवर्गामध्ये संगणक हाताळणी वापराबाबत माहिती तंत्रज्ञान संचालनालयाने विहित केलेली परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र धारण करणारे उमेदवार अर्ज करु शकतात असे जाहिरातीत नमूद आहे.<br>आता त्याचबरोबर जे उमेदवार दहावी व बारावी परीक्षेच्या अभ्यासक्रमामध्ये संगणक व माहिती तंत्रज्ञान संबंधित विषय घेवून उत्तीर्ण झाले असतील.<br>किंवा<br>अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली (AICTE) मार्फत मान्यताप्राप्त सर्व पदवी व पदवीका (सर्व अभियांत्रिकी शाखा) प्राप्त उमेदवार<br>किंवा<br>इंडियन सर्टिफिकेट ऑफ स्कूल एज्युकेशन (ICSC) यांच्या मार्फत मान्यताप्राप्त इयत्ता दहावी व बारावी परीक्षेच्या अभ्यासक्रमामध्ये असलेले संगणक व माहिती तंत्रज्ञान संबंधित विषय घेवून उत्तीर्ण झाले असतील.<br>वरीलपैकी कोणत्याही एक प्रकारे संगणक व माहिती तंत्रज्ञानाबाबतचे प्रमाणपत्र धारण करीत असतील असे उमेदवार सदर पदासाठी अर्ज करु शकतात. |

दिनांक :- २०/०८/२०२३

स्थळ :- रत्नागिरी

(परीक्षित यादव)
उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.वि.)
जिल्हा परिषद रत्नागिरी

(किर्ती किरण पुजार, **भा.प्र.से.**)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद रत्नागिरी